ISSN 2277- 8063

Int (1)

2020-21

Peer-Reviewed (26)

# Navjyot

# नवज्योत

International Interdisciplinary Research Journal
( Humanities, Social Sciences, Languages, Commerce & Management )

www.navjyot.net

E-mail : editornavjyot@gmail.com

7/12

## CONTENT


| Sr. No | Subject | Title | Author | P. No. |
|---|---|---|---|---|
| 1 | English | Theme of Scepticism, Deception and Suicide in the novel, 'The Lost Man' by Jane Harper: A Psychoanalytical Study | Ms Vandana Mishra | 1-2 |
| 2 | Political Science | Agricultural Policy After Pandit Jawaharlal Nehru | Mr. Shrikant Namdev Phakade | 3-5 |
| 3 | राज्यशास्त्र | भूदान चळवळ : स्वातंत्रोत्तर समाजक्रांतीकारक चळवळ | प्रा. प्रमोद जगन्नाथ पाटील | 6-13 |
| 4 | मराठी | दासबोधातील उत्तम लक्षण व वैचारिक निरूपणाचे आजच्या काळाच्या संदर्भातील महत्व | प्रा. डॉ. सजुय बाबुराव पाटील | 14-16 |
| 5 | राज्यशास्त्र | १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शेतीव्यवस्था | प्रा. अंगद नरसगोंडा पाटील | 17-19 |
| 6 | राज्यशास्त्र | भारताचे लुक ईस्ट धोरण | डॉ. संजय गोरे | 20-23 |
| 7 | Political Science | Challenges and Opportunities of pre& post COVID – 19 in India | Dr. Alpana Vaidya | 24-26 |
| 8 | Political Science | Women's Political participation in India | Dr.Vikas Babasaheb Chandajkar | 27-29 |
| 9 | राज्यशास्त्र | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या पूर्व काळातील कृषी धोरण | सौ. उषादेवी अंकुश कांबळे | 30-32 |
| 10 | Economics | "Role Of The Swachh Bharat Mission (Gramin) Into The New Bharat" | Arun B. Chavhan | 33-35 |
| 11 | Law | Right To Equality And Daughter's Equal Right In Ancestral Property | Mrs.Chandani Vishwasrao Ghogare | 36-40 |
| 12 | अर्थशास्त्र | कृषी कायद्याचे वास्तव विश्लेषण | डॉ. मोहन सदामते | 41-42 |
| 13 | English | Transgender Identity and Equality : A path to development | Dr. Savita D. Thakare | 43-45 |
| 14 | Political Science | The contemporary utility of Agricultural Policy of Pandit Jawaharlal Nehru. | Vaibhav Nikam, | 46-50 |
| 15 | राज्यशास्त्र | मूलतत्ववाद : संकल्पना आणि वास्तव | डॉ. अनिल रा. कडू | 51-53 |
| 16 | राज्यशास्त्र | आधुनिक भारताच्या शेती उत्पादन वाढीत पंडीत जवाहरलाल नेहरू यांचे योगदान | संजय कुबल | 54-55 |
| 17 | अर्थशास्त्र | पंडित जवाहरलाल नेहरू काळातील कृषी धोरण | डॉ. ज्ञानराजा चिघळीकर | 56-59 |
| 18 | राज्यशास्त्र | पंडित जवाहरलाल नेहरूंच्या कृषी धोरणाचा अभ्यास | प्रा. बळवंतराव कुंडलिक जाधव | 60-65 |
| 19 | राज्यशास्त्र | भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप आणि विकास | डॉ. एस. पी. वेल्हाळ | 66-72 |
| 20 | Economics | Impact of the Corona Virus Pandemic COVID-19 on Indian Economy | Mr.Amar Raju Jadhav<br>Mr.Dnyaneshwar Krishna Pathrut | 73-79 |

# पंडित जवाहरलाल नेहरू काळातील कृषी धोरण

डॉ. ज्ञानराजा चिघळीकर, अर्थशास्त्र विभाग, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज.

**प्रस्तावना :**

पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्य आंदोलनातील एक अग्रणी नेते होते. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली ते स्वातंत्र्य लढयात सक्रीय होते. स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरूजींची प्रचंड लोकप्रियता होती. त्यामुळेच स्वातंत्र्यानंतर देशाचे नेतृत्व त्यांच्याकडेच असणार ही काळया दगडावरची रेष होती. पंडित जवाहरलाल नेहरू हे स्वातंत्र्यानंतर म्हणजेच १५ ऑगस्ट १९४७ ते त्यांच्या निधनापर्यंत म्हणजे २७ मे १९६४ पर्यंत भारताचे प्रधानमंत्री होते. आपल्या प्रधानमंत्री पदाच्या १७ ते १८ वर्षे इतक्या प्रदिर्घ कालखंडात त्यांनी खऱ्या अर्थाने कृषी आणि औद्योगिक विकासाचा मजबूत पाया घातला.

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या मध्यरात्री राष्ट्राला उद्देशून केलेल्या भाषणातून नेहरूजींची भूमीका लक्षात येते. ''फार वर्षापूर्वी आपण नियतीशी करार केला होता. वेळ ठरविली होती आणि आता वचनपूर्तीचा समय आला आहे. हे वचन पूर्णपणे नसेल पण बऱ्याच प्रमाणात आपण पूर्ण करीत आहोत. आज मध्यरात्री जग झोपी जाईल तेंव्हा भारत नवचैतन्याने जागृत होईल इतिहासात असा एखादाच क्षण येतो की, जेंव्हा आपण जुन्यातून नव्यात प्रवेश करतो, जेंव्हा एखादे युग संपते आणि दीर्घकाळ दडपलेल्या राष्ट्राच्या आत्म्याला अभिव्यक्तीची संधी मिळते.'' नियतीशी करार या नावाने प्रसिध्द झालेल्या भाषणाच्या सदर ओळीतून त्यांनी आपल्या देश बांधवांना नियतीने आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीची जाणीव करून दिली. आणि आयुष्यभर त्यांनी राष्ट्रसेवाच केली. त्यांच्यावर नेहमीच आरोप केला जातो की, नेहरूंनी आपल्या कालखंडामध्ये अवजड उद्योगांवरच जास्त भर दिला शेतीसाठी कांही केले नाही. तेंव्हा सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या काळातील कृषी धोरणाचा आढावा घेण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टये :**

१) नेहरू पूर्व काळातील कृषी विषयक धोरणांचा थोडक्यात आढावा घेणे

२) नेहरू काळातील कृषी विषयक धोरणांचा अभ्यास करणे.

**गृहितके:**

१) पंडीत जवाहरलाल नेहरू पूर्व कालखंड हा ब्रिटीश कालखंड असल्यामुळे शेती विकासाला दुय्यम स्थान दिले गेले होते.

२) पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या काळामध्ये उद्योगांच्या विकासाला प्राधान्य दिले गेले असले तरी कृषी विकासावर भर दिला गेला होता.

**माहिती स्त्रोत व संशोधन पध्दती:**

सदर शोध निबंधासाठी माहितीच्या दुय्यम साधनांचा वापर करण्यात आलेला आहे. ज्यामध्ये संदर्भ ग्रंथ व पुस्तकांचा आधार घेतला गेलेला आहे.

**पंडीत जवाहरलाल नेहरू पूर्व काळातील कृषी विषयक धोरण :**

स्वातंत्र्यपूर्व कालखंड हा ब्रिटीश कालखड म्हणून ओळखला जातो. भारतामध्ये येऊन व्यापार करणे हा ब्रिटीशांचा मुख्य उद्देश होता. नंतर ते राज्यकर्ते बनले असले तरीही, त्यांचा कल व्यापाराकडेच होता. म्हणून ब्रिटीशांचे कृषी विषयक धोरण कृषीला मारक ठरणारे होते. शेतीमध्ये त्यांनी केलेली गुंतवणुक अत्यंत नगण्य होती. शेतकऱ्यांची आर्थिक पिळवणूक होती. दुष्काळाच्या वारंवारीतेत वाढ झालेली होती. तेव्हा आपले प्रश्न सोडवण्यासाठी शेतकऱ्यांनी संगठीत होण्याला सुरूवात केली होती, म्हणून ब्रिटीशांना नाईलाजाने शेतीकडे लक्ष द्यावे लागले.

दुष्काळांचा अभ्यास करण्यासाठी सन १८८० मध्ये दुष्काळ आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाच्या शिफारशी नुसार केंद्र आणि राज्य स्तरावर कृषी विभागांची स्थापना करण्यात आली. सन १९८९ मध्ये डॉ. ओयलकर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या समीतीने शेती आणि शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी उपाय सूचवले. उपयांचा

सकारात्मक परिणाम म्हणजे कृषी क्षेत्रात वैज्ञानिक संशोधनाला सुरूवात झाली. प्रांतीय सरकारांनी त्यामध्ये आपली रूची दाखवली. याच काळात लॉर्ड कर्जनची व्हाईसरॉय म्हणून नेमणूक झाली. त्याच्या कालखंडात कृषी विभगांची पुनर्बांधणी करण्यात आली. सन १८९५ ते १९०१ दरम्यानच्या दुष्काळामुळे १९०१ मध्ये पुन्हा दुष्काळ आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाने कृषी संबंधी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी देशामध्ये निरंतर शोध प्रक्रिया सुरू ठेवण्याची शिफारस केली.

प्रांतीय कृषी विभागामध्ये समन्वय स्थापीत करण्यासाठी १९०१ मध्ये एक ''इनस्पेक्टर जनरल ऑफ अॅग्रीकल्चर'' ची नेमणूक करण्यात आली. सन १९०२ मध्ये लॉर्ड कर्जनने सिंचन आयोगाची स्थापना केली. सन १९०५ मध्ये केंद्र आणि राज्यातील शेती विभागात समन्वय प्रस्थापित करण्यासाठी शेती विभागाचे पुनर्गठन करण्यात आले व आखील भारतीय कृषी बोर्डाची स्थापना करण्यात आली. सन १९१९ मधील संवैधानिक सुधारणांचा परिणाम म्हणून कृषी हा प्रांतीय विषय बनवला गेला, आणि तो प्रांतीय मंत्र्यांच्या देखरेखीखाली आला. तर भारत सरकारचा कृषी विभाग केवळ राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या कृषी विषयावरच लक्ष केंद्रीत करायला लागला.

सन १९२६ मध्ये ब्रिटीश भारतातील कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी सरकारच्या वतीने 'शाही कृषी आयोग' (Royal Commission on Agriculture) स्थापन करण्यात आला. आयोगाने सन १९२८ मध्ये आपल्या शिफारशी सरकारला सादर केल्या आणि असे स्पष्ट केले की, भारतीय कृषी मधील सुधारणेची समस्या ही मुख्यत: भारतीय ग्रामीण जीवनामध्ये सुधारणा करण्याची समस्या आहे. याचा सर्वांगीन अभ्यास केला गेला पाहिजे; तसेच आयोगाने शेत जमीनीचे विभाजन, अपखंडन, पशुधन, जलसिंचन, कृषी विपणन, सहकार, ग्रामीण शिक्षण व पुनर्निर्माना संदर्भात महत्वपूर्ण शिफारशी केल्या. याला अनुसरून सन १९२९ मध्ये 'इंडीयन कॉन्सिल फॉर अॅग्रीकल्चरल रिसर्च (ICAR) म्हणजेच 'भारतीय कृषी संशोधन व विकास परिषद' स्थापन करण्यात आली.

सन १९२९ मधील जागतीक महामंदीचे विपरित परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेला भोगावे लागले. शेतमालाच्या घटलेल्या किंमतीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हालाखीची बनली तरीही ब्रिटीश सरकारने दखल घेतली नाही. सन १९३७ मध्ये प्रांतीय सरकारे स्थापन झाली. वेगवेगळ्या राज्यात मंत्रीमंडळे अस्तीत्वात आली. ही मंत्रीमंडळे भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्व करणारी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरूवात झाली. मंत्रीमंडळांकडे कृषी संबंधीत निश्चित अशा योजना नसल्यामुळे त्याच्या कार्याचा फारसा विस्तार झाला नाही. तो फक्त भूमीसुधार आणि ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करण्यापुरताच मर्यादीत राहिला.

दुसऱ्या जागतीक महायुध्दाच्या काळात अन्नधान्याची आयात पूर्णत: बंद झाली. देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यातच सन १९४२–४३ मध्ये बंगालच्या दुष्काळाची भर पडली. भूकबळींची संख्या वाढली आणि ब्रिटीश सरकारचे लक्ष भारतीय शेतीकडे वळले. अन्नधान्याच्या उत्पादनावर जोर देण्यात आला. राशनिंग व्यवस्था व अन्न संग्रह नितीचा अवलंब करण्यात आला. सन १९४३ मध्ये भारत सरकारच्या वतीने खाद्यान्न निती समतीची नियुक्ती करण्यात आली. समीतीच्या शिफारशी नुसार १९४४ मध्ये अधिक धान्य उत्पादनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. सन १९४७ मध्ये स्वातंत्र्या बरोबरच भारताची फाळणी झाली. अन्नधान्याचे उत्पादन करणारा मोठा भूभाग पाकिस्तानच्या वाट्याला तर बहुसंख्या लोकसंख्या भारताच्या वाट्याला आल्यामुळे पुन्हा अन्न धान्याच्या टंचाईचा प्रश्न निर्माण झाला.

**नेहरू काळातील कृषी विषयक धोरण :**

स्वातंत्र्योतर काळामध्ये शेती विकासावर भर देण्यात आला. शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलला. शेती केवळ अन्नधान्याचा पुरवठा करणारा स्त्रोत नसून उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा साठा करणारे साधन म्हणून बघीतले गेले. अधिक धान्य पिकवा कार्यक्रमावर जोर देण्यात आला.

**१) अन्न धान्याची टंचाई दूर करण्यासाठी समिती:**

सन १९४९ मध्ये ठाकूरदास यांनी अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासंदर्भात शिफारशी केल्या. कृष्णमाचारी परेषण समीतीने ही अधिक धान्य उत्पादन करण्याची शिफारस केली. या शिफारशींचा विचार करून शेती विषयक धोरणांची उद्दीष्टे ठरवण्यात आली. यामध्ये राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करणे, उद्योगांसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन वाढवणे, अन्न धान्याच्या बाबतीत देशाला स्वावलंबी बनवणे, उपभोक्त्यांना माफक किंमतीमध्ये अन्नधान्याचा पुरवठा करण्याचा प्रयत्न करणे, कृषी आणि उद्योग क्षेत्रात रोजगार निर्मिती वाढवणे, ग्राहकांना आवश्यक असणाऱ्या शेती उत्पादनांच्या पुरवठ्यात वाढ करणे उदा. दूध, फळे, भाजीपाला इत्यादी.

**२) जमीनदारीचे उच्चाटण :**

भारत हा शेतीप्रधान देश असला तरी, त्या काळात जमीनदारी पध्दती अस्तीत्वात होती. जमीनदारी पध्दतीमध्ये कुळांचे मोठया प्रमाणात शोषण केले जात होते. म्हणून नेहरूंच्या नेतृत्वाखाली सरकारने जमीनदारी पध्दती नष्ट करून कसेल त्याची जमीन हे तत्व स्विकारले. कुळ कायदे करण्यात आले. या कायद्यांना घटनात्मक संरक्षण देण्यासाठी मालमत्तेच्या हक्कावर मर्यादा घालण्यात आली. आणि अशा प्रकारची आर्थिक विषमता निर्माण करणारी व्यवस्था मोडून काढली.

**३) औद्योगीकरणाच्या माध्यमातून कृषी विकास:**

नेहरूजींची अशी भूमीका हाती की, औद्योगीकरणच देशाची गरीबी दूर करू शकेल कारण औद्योगीकीकरणाच्या माध्यमातून शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त ताण कमी करता येईल. म्हणून ते म्हणतात की, ''मी मोठया उद्योगांचा पुरस्कर्ता आहे. वेगाने होणारे औद्योगिकरणच शेतजमीनीवरील लोकसंख्येचा भार कमी करू शकेल, लोकांचे दारिद्रय कमी करू शकेल. लोकांचे राहणीमान उंचावू शकेल आणि इतर अनेक उदिष्टे पार पाडू शकेल.'' शेतीचा विकास हा औद्योगीक विकासावर आणि औद्योगीक विकास हा शेती विकासावर अवलंबून असतो. कारण शेतीतील कच्चा माल मिळाला तरच उद्योगांची चाके फिरतात. शेतीचे यांत्रीकीकरण व आधूनिकीकरण केले तरच उत्पादनात वाढ होते.

**४) समूह विकास योजना :**

ग्रामीण भागातील लोकांचा सर्वांगीण विकास करणे, ग्रामीण जनतेच्या दृष्टीकोणात सकारात्मक बदल घडवून त्यांच्यात उच्च दर्जाच्या राहणीमानाची इच्छा निर्माण करण्याच्या हेतूने १९५२ साली नेहरूजींच्याच हस्ते या योजनेचा शुभारंभ करण्यात आला. समूह विकास योजना ही खऱ्या अर्थाने ग्रामीण जिवनाला आत्मनिर्भर करण्यासाठीच तयार करण्यात आलेली योजना होती. शेती उत्पादनात वाढ करणे. ग्रामीण उद्योग व कारागिरीमध्ये सुधारणा घडवूण आणणे, ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा निर्माण करणे. आरोग्य सेवा पुरविणे. ग्रामीण गृहबांधणीचा कार्यक्रम हाती घेणे. करमणूक केंद्राची स्थापना करणे. अशा प्रकारची बहुउद्देशीय परंतु एकात्म स्वरूपाची योजना होती. योजने संदर्भात नेहरूजी म्हणतात की, ''भारतातील सर्वात मोठी योजना म्हणजे मोठे उद्योगधंदे आणि कारखाने नाहीत तर सर्व भारताचा चेहरा मोहरा बदलणारी समूह विकास योजना ही आहे. ही योजना ग्रामीण जीवनात क्रांतिकारी बदल घडवून आणीत आहे. हा बदल घडताना पाहून माझे मन उत्साहाने भरून येते.''

**पंचवार्षिक योजना काळातील कृषी विषयक धोरण :**

नेहरूंच्या विचारांवर समाजवादी तत्वज्ञानाच्या प्रभाव होता, कार्ल मार्क्सच्या विचारावर आधारीत सन १९१७ मध्ये रशियन राज्यक्रांती झाली. आणि जगातील पहीले साम्यवादी सरकार सत्तेवर आले. १९२७ मध्ये नेहरूजींनी रशियाला भेट दिली. रशियन अर्थव्यवस्थेच्या नियोजनावर प्रभावीत झाले. आणि भारतासाठी ही पंचवार्षिक योजनांचा स्विकार केला. पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून देशाच्या विकासाचा आराखडा तयार करण्यात येवू लागला. सदर पंचवार्षिक योजनांमध्ये शेती विकासासाठी आखलेल्या धोरणाचा आढावा पुढीलप्रमाणे

**१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१ ते १९५६)**

योजनेचा कालावधी १ एप्रिल, १९५१ ते ३१ मार्च १९५६ असा ठरवण्यात आला. गरज लक्षात घेऊन शेती विकासाला प्राधान्य देण्यात आले. योजनेत देशाला अन्नधान्याच्या

बाबतीत स्वावलंबी बनवणे, कच्च्या मालाच्या उत्पादनात वाढ करणे या उद्दीष्टांबरोबरच शेतीच्या स्थिर विकासासाठी आधुनिक उपकरणे, बी–बीयाणे, रासायनीक खते, सिंचन सुविधा, शेतमालाला योग्य किंमत, विपणन, साठवणुक, कर्जसुविधा आणि शेती पुनर्गठन करण्यावर भर देण्यात आला. योजनेत शेती उत्पादनात १८ टक्के इतकी वाढ झाली. कृषी, संबंधीत क्षेत्र, जलसिंचन व पुरनियंत्रणावर ७२४ कोटी रू. खर्च करण्यात आला. एकूण योजना खर्चाच्या ३७ टक्के इतके प्रमाण होते.

**२ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६ ते १९६१) :**

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेमध्ये शेती ऐवजी औद्योगीक विकासाला प्राधान्य देण्यात आले. कृषी नियोजनामध्ये जमीन वापराचे नियोजन, अल्पकालीन आणि दीर्घकालीन उद्दीष्टांचे निर्धारण, शेतमालाची निर्यात, विकास कार्यक्रम आणि सरकारी मदतीला जमीन उत्पादनाचे उद्दीष्ट आणि नियोजनाशी जोडून घेण्यावर भर देण्यात आला. कृषी, जलसिंचन व पुरनियंत्रणावर ९७९ कोटी रू. खर्च करण्यात आला. योजना खर्चाच्या २०.९ टक्के इतके प्रमाण होते. योजना कालावधीत निसर्गाच्या प्रतीकुलतेमुळे अन्नधान्याच्या उत्पादनात घट झाल्यामुळे आयात करावी लागली. अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली अन्नधान्य चौकशी समिती नियुक्त करण्यात आली. समीतीने अन्नधान्य उत्पादन व किंमत नियंत्रणासाठी अनेक महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या. १९५९ मध्ये भारत भेटीवर आलेल्या फोर्ड फाऊंडेशन च्या कृषी अभ्यास गटानेही महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या.

**३ तीसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६) :**

दुसऱ्या योजनेचे अपयश लक्षात घेता तीसऱ्या योजनेत शेती विकासावर भर देण्यात आला. विशेषत: विस्तृत शेती विकास कार्यक्रमावर लक्ष केंद्रीत करणे, सामुदायिक विकास आंदोलन सुरू करणे, सहकारी संस्थांची स्थापना करून सहकारी शेतीवर भर देणे. शेतीमध्ये आधुनिक यंत्रे उपकरणे वापरण्यास चालना देणे, आणि विक्री योग्य शेतमालाचे उत्पादन वाढविण्यावर अधिक भर देण्यात आला. एकूण खर्चाच्या २० टक्के रक्कम शेती विकासावर खर्च करण्यात आली.

**निष्कर्ष:**

१) पंडीत जवाहरलाल नेहरू पूर्व कालखंड हा ब्रिटीश कालखंड असल्यामुळे ब्रिटीशांनी शेती विकासाला दुय्यम स्थान दिले. शेती विषयक कांही धोरणे आखली ती केवळ भारतीय शेतीचा विकास करण्याच्या उद्देशाने नव्हे तर त्यात त्यांची स्वार्थप्रेरणा दडलेली होती.

२) पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी आपल्या कालखंडामध्ये अन्नधान्याची टंचाई दूर करण्यासाठी उपयुक्त असे कृषी विषयक धोरण राबवले. कुळ कायदे करून जमीनदारी या शोषणकारी व्यवस्थेचे उच्चाटन केले. औद्योगीकीकरणावर भर देवून कृषी विकासाला ही प्राधान्य दिले. समुह विकास योजनेच्या माध्यमातून ग्रामीण लोकांच्या सर्वांगीन विकासासाठी प्रयत्न केले.

३) पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी विकासावर भर दिला विशेषत: त्यांच्या काळातील एकूण तीन पंचवार्षिक योजनांपैकी पहिल्या आणि तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावर भर दिला.

अशाप्रकारे पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्यावर कृषी विकासाकडे दुर्लक्ष केले जाते असा आरोप केला जात असला तरी त्यात फारसे तथ्य नाही. नेहरूजींनी खऱ्या अर्थाने देशाच्या सर्वांगीन विकासावर भर दिलेला दिसून येतो. त्यात त्यांनी शेतीच्या विकासालाही प्राधान्य दिले होते. तशा प्रकारच्या योजना आणि धोरणांची आखणी करून अंमलबजावणी केली होती.

**संदर्भ :**

१. प्रा. र. घ. वराडकर (१९९७) निराली प्रकाशन, पुणे.

२. डॉ. गंगाधर वि. कायंदे–पाटील ( २००८) चैतन्य पब्लिकेशन्स,नाशिक – १३

सकारात्मक परिणाम म्हणजे कृषी क्षेत्रात वैज्ञानिक संशोधनाला सुरूवात झाली. प्रांतीय सरकारांनी त्यामध्ये आपली रूची दाखवली. याच काळात लॉर्ड कर्जनची व्हाईसरॉय म्हणून नेमणूक झाली. त्याच्या कालखंडात कृषी विभगांची पुनर्बांधणी करण्यात आली. सन १८९५ ते १९०१ दरम्यानच्या दुष्काळामुळे १९०१ मध्ये पुन्हा दुष्काळ आयोगाची स्थापना करण्यात आली. आयोगाने कृषी संबंधी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी देशामध्ये निरंतर शोध प्रक्रिया सुरू ठेवण्याची शिफारस केली.

प्रांतीय कृषी विभागामध्ये समन्वय स्थापीत करण्यासाठी १९०१ मध्ये एक "इनस्पेक्टर जनरल ऑफ अॅग्रीकल्चर" ची नेमणूक करण्यात आली. सन १९०२ मध्ये लॉर्ड कर्जनने सिंचन आयोगाची स्थापना केली. सन १९०५ मध्ये केंद्र आणि राज्यातील शेती विभागात समन्वय प्रस्थापित करण्यासाठी शेती विभागाचे पुनर्गठन करण्यात आले व आखील भारतीय कृषी बोर्डाची स्थापना करण्यात आली. सन १९१९ मधील संवैधानिक सुधारणांचा परिणाम म्हणून कृषी हा प्रांतीय विषय बनवला गेला, आणि तो प्रांतीय मंत्र्यांच्या देखरेखीखाली आला. तर भारत सरकारचा कृषी विभाग केवळ राष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाच्या कृषी विषयावरच लक्ष केंद्रीत करायला लागला.

सन १९२६ मध्ये ब्रिटीश भारतातील कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यासाठी सरकारच्या वतीने 'शाही कृषी आयोग' (Royal Commission on Agriculture) स्थापन करण्यात आला. आयोगाने सन १९२८ मध्ये आपल्या शिफारशी सरकारला सादर केल्या आणि असे स्पष्ट केले की, भारतीय कृषी मधील सुधारणेची समस्या ही मुख्यत: भारतीय ग्रामीण जीवनामध्ये सुधारणा करण्याची समस्या आहे. याचा सर्वांगीन अभ्यास केला गेला पाहिजे; तसेच आयोगाने शेत जमीनीचे विभाजन, अपखंडन, पशुधन, जलसिंचन, कृषी विपणन, सहकार, ग्रामीण शिक्षण व पुनर्निर्माना संदर्भात महत्वपूर्ण शिफारशी केल्या. याला अनुसरून सन १९२९ मध्ये 'इंडीयन कॉन्सिल फॉर अॅग्रीकल्चरल रिसर्च (ICAR) म्हणजेच 'भारतीय कृषी संशोधन व विकास परिषद' स्थापन करण्यात आली.

सन १९२९ मधील जागतीक महामंदीचे विपरित परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेला भोगावे लागले. शेतमालाच्या घटलेल्या किंमतीमुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती हलाखीची बनली तरीही ब्रिटीश सरकारने दखल घेतली नाही. सन १९३७ मध्ये प्रांतीय सरकारे स्थापन झाली. वेगवेगळ्या राज्यात मंत्रीमंडळे अस्तीत्वात आली. ही मंत्रीमंडळे भारतीय जनतेचे प्रतिनिधीत्व करणारी असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे लक्ष द्यायला सुरूवात झाली. मंत्रीमंडळांकडे कृषी संबंधीत निश्चित अशा योजना नसल्यामुळे त्याच्या कार्याचा फारसा विस्तार झाला नाही. तो फक्त भूमीसुधार आणि ग्रामीण कर्जबाजारीपणा कमी करण्यापुरताच मर्यादीत राहिला.

दुसऱ्या जागतीक महायुध्दाच्या काळात अन्नधान्याची आयात पूर्णत: बंद झाली. देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली. त्यातच सन १९४२–४३ मध्ये बंगालच्या दुष्काळाची भर पडली. भूकबळींची संख्या वाढली आणि ब्रिटीश सरकारचे लक्ष भारतीय शेतीकडे वळले. अन्नधान्याच्या उत्पादनावर जोर देण्यात आला. राशनिंग व्यवस्था व अन्न संग्रह नितीचा अवलंब करण्यात आला. सन १९४३ मध्ये भारत सरकारच्या वतीने खाद्यान्न निती समतीची नियुक्ती करण्यात आली. समीतीच्या शिफारशी नुसार १९४४ मध्ये अधिक धान्य उत्पादनाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. सन १९४७ मध्ये स्वातंत्र्या बरोबरच भारताची फाळणी झाली. अन्नधान्याचे उत्पादन करणारा मोठा भूभाग पाकिस्तानच्या वाट्याला तर बहुसंख्या लोकसंख्या भारताच्या वाट्याला आल्यामुळे पुन्हा अन्न धान्याच्या टंचाईचा प्रश्न निर्माण झाला.

**नेहरू काळातील कृषी विषयक धोरण :**

स्वातंत्र्योतर काळामध्ये शेती विकासावर भर देण्यात आला. शेतीकडे बघण्याचा दृष्टीकोण बदलला. शेती केवळ अन्नधान्याचा पुरवठा करणारा स्त्रोत नसून उद्योगांना लागणाऱ्या कच्च्या मालाचा साठा करणारे साधन म्हणून बघीतले गेले. अधिक धान्य पिकवा कार्यक्रमावर जोर देण्यात आला.